# खरेदीखत

खरेदीखत मौजे पिंप्राळा शिवारातील तालुका जिल्हा जळगांव येथील जळगांव महानगरपालिका हद्दीतील फ्लॅट सिस्टीमने बांधलेल्या **''गौरी क्लासीक''** या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट घरजागेचे सुखसोईतील अविभाज्य हिश्याचे वापर हक्कासह किंमत रक्कम रुपये ----------/- अक्षरी रुपये ---------------------- मात्रचे आज दि.   /   /      रोजी लिहुन दिले असे.

----------------

उ.व.-----, व्यवसाय-------- **लिहून घेणार**

रा.----------------

पॅन नं. -------------

**पाटील ॲन्ड देशमुख असोसिएटस्**

प्लॉट नं.३२, गट नं.४४७/२, गौरी रेसीडेन्सी **लिहून देणार**

नुतन वर्षा कॉलनी, महाबळ, जळगांव

उ.व.------, व्यवसाय----------,

--------------------

--------------------

**कारणे खरेदीखत लिहून देतोत की,** आमची स्वसंपादीत, सामाईक मालकीची, वहिवाटीची व प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील खालील वर्णन केलेली स्थावर मिळकत **''गौरी क्लासीक''** मधील ------ मजल्यावरील फ्लॅट घरजागा तसेच त्यातील सामाईक सुखसोईंचे वापर हक्कासह आम्ही तुम्हांस किमत रक्कम रुपये -----------/-

अक्षरी रुपये ---------------------
मात्रवर कायमस्वरूपी पुर्ण मालकी हक्काने राजीखुशीने खरेदी देऊन आज रोजी तुमचे प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात दिली आहे. व तुम्ही प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात घेतली आहे.

**त्या मिळकतीचे वर्णन :-**

---------------------------------------------
---------------------------------------------

**मौजे --------------- गट नं. -----** यात मे.जिल्हाधिकारी सो. जळगांव भाग जळगांव यांचेकडील बिनशेती हुकुम नं.-------------------- ------------------- अन्वये व त्यांनी मंजुर केलेल्या नकाशाप्रमाणे बखळ प्लॉटस् पाडलेले आहेत. त्या प्लॉटांपैकी –

**----------------------------------- याचे संपूर्ण क्षेत्र -----------चौरस मीटर आहे.**

**याची लांबी रुंदी :-**

पुर्व बाजु – ------- मीटर,

उत्तर बाजु – ------- मीटर,

**यास चतु:सिमा :-**

पुर्वेस – ----------

उत्तरेस – ----------

येणेप्रमाणे चतु:सिमेतील बखळ प्लॉट नं.----------------- याचे संपूर्ण क्षेत्र -------- चौरस मीटर या जागेचे मोबदलाखत पाटील ॲन्ड देशमुख असोसिएटस् प्रो.प्रा.---------------- यांनी दस्त नं.-------, दि. / / अन्वये ------------- (------) जळगांव–२ यांचे कार्यालयात नोंदविले आहे.

तसेच सदर प्लॉट जागेवर वाढीव बांधकाम करणेकामी दस्त क्र.----------- दि. / / अन्वये हस्तांतरणीय विकास हक्क (एफ.एस.आय.) याचे क्षेत्र -------- चौरस मीटर टी.डी.आर खरेदी केलेला असुन वाढीव प्राप्त झालेल्या एफ.एस.आय.नुसार बांधकाम करणेकामी म.आयुक्त साो. जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचेकडील पत्र क्र. ---------------- दि. / / अन्वये बांधकाम परवानगी घेतलेली आहे व मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे या जागेवर तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला व पाचवा मजला असे असुन यात एकूणात ५ (पाच) फ्लॅट सिस्टीम इमारतीचे **आर.सी.सी.** मध्ये बांधकाम पूर्ण केलेले आहे. व त्या संपूर्ण इमारतीचे बांधकामात ''**गौरी क्लासीक**'' असे नांव दिलेले आहे. या इमारतीतील संपुर्ण बांधकामीपैकी –

**------------ मजल्यावरील फ्लॅट नं.-------------- यांचे बांधीव क्षेत्र --------- चौरस मीटर**

सदर फ्लॅट जागेत एक लिव्हींग रू, एक किचन रूम, एक बेडरूम, एक मास्टर बेडरूम टॉयलेट सह, एक टॉयलेट असे बांधकाम केलेले आहे. तसेच सदर फ्लॅटमध्ये इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग केलेली असुन त्यास लागणारे इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन व नळ कनेक्शन ते तुम्ही तुमचे खर्चाने घ्यावयाचे आहे.

सदर ''**गौरी क्लासीक**'' या इमातीसाठी असलेल्या सामाईक सुखसोई जसे– तळजमिन, पार्कींगजागा, इमारतीतील जिना, गच्ची, कम्पाऊंड वॉल, कंपाऊंड गेट, सेप्टीक टँक, सदर इमारतीचे सामाईक जागेतील इलेक्ट्रीक फिटींग, नळ फिटींग, सॅनिटरी फिटींग, ड्रेनेज फिटींग, इमारतीच्या मुख्य भिंती, कॉलम, बीम, छत, ओपन डक्टस्, तळ जागेवरील बोअरवेल त्यावरील इलेक्ट्रीक पंप, पॅनल बोर्ड, पाईप फिटींग वगैरे सुखसोई इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईकात असुन सदरचे सामाईक सुखसोईत तुमचे

फ्लॅट जागेचा **--------% अविभाज्य हिस्सा** आहे.

**यास चतु:सिमा :-**

पुर्वेस - ------------

पश्चिमेस - --------------------

उत्तरेस - -------------

दक्षिणेस - -------------

येणेप्रमाणे चतु:सिमेतील स्थावर मिळकत फ्लॅट घरजागा, आतील दरवाजे, खिडक्या, इलेक्ट्रीक फिटींग व नळ फिटींग, मालकीहक्कासह तसेच सदर जागेसाठी असलेल्या सामाईक सुखसोईचे वापर हक्कासह व तदंगभुतवस्तुसुद्धा आम्ही तुम्हांस आज रोजी रक्कम रु.-------------/- ------------------------ मात्रवर कायम पुर्ण मालकी हक्काने कायम खुश खरेदी देऊन आज रोजी तुमचे प्रत्यक्ष कब्जे वहीवाटीत व ताब्यात दिली. त्याबद्दल तुम्ही आम्हाला खालीलप्रमाणे भरणा दिला तो असा.

**त्या भरण्याचा तपशील :-**

--------------------------------------------

-----------------------------------------------

------------------------------------

येणेप्रमाणे भरणा पावला. तो आम्ही आमचे हिस्सेराशीप्रमाणे वाटून घेतला. आता भरण्याबद्दल आमची कोणतीही तक्रार राहीलेली नाही. त्या खरेदीखताच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे -

सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट जागेचे तुम्ही या खरेदीखताने पुर्ण व कायमचे मालक व कब्जेदार झाला आहात. सबब सदर फ्लॅट जागेचा तुम्ही वंशपरंपरा उपभोग घ्यावा अगर तुमचे मर्जीनुरूप विनीयोग करावा.

सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या मिळकतीवर आता आमचा अगर आमचे वंशवारसदार, नातेवाईक, भाऊबंद, बहीणी, भागीदार, असायनी, ट्रान्सफरी वगैरे कोणाचाही काही एक मालकी हक्क अथवा हितसंबंध राहिला नाही. तसा तो कोणी दाखविल्यास तो या खरेदीखतान्वये रद्दबातल समजण्यात यावा.

**अटी व शर्ती :–**

१) सदर सविस्तर वर्णन केलेली स्थावर मिळकत फ्लॅट घरजागा मौजे -------- शिवारातील, मे.कलेक्टर सो. ------------------------------------------- यांचे हद्दीतील आहे. सबब त्यांचेकडील सर्व हुकूम, नियम, अटी व शर्ती मालक व कब्जेदार म्हणून तुमचेवर बंधनकारक राहतील.

२) भविष्यात सदर मिळकतीवर वाढीव एफ.एस.आय. व टी.डी.आर. मिळाल्यास त्याची मालकी लिहून देणार यांची राहील. तसेच वाढीव एफ.एस.आय व टी.डी. आर. नुसार सदर इमारतीवर वाढीव बांधकाम करावयाचे असल्यास त्यास तुम्ही लिहून घेणार यांची कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही अगर तशी ती तुम्हास दाखविण्याचा अधिकार राहणार नाही. सदर एफ.एस.आय. व टी.डी.आर. चा वापर लिहून देणार हे त्यांचे मर्जिनुरूप करतील. त्यावर तुमचा कोणताही अधिकार राहणार नाही अगर मागता येणार नाही.

३) सदर ''**गौरी क्लासीक**'' बाबत आम्ही महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट १९७० अन्वये घोषणापत्र (Deed Of Declaration) तयार करून ते म.दुय्यम निबंधक साहेब जळगांव वर्ग–१ यांचे कचेरीत दस्त नं.-------, तारीख / / अन्वये नोंदलेले आहे. सदर अपार्टमेंट ओनर्स असोसिएशन स्थापन झालेली आहे व त्यात तुम्हांस सभासद करून घेतलेले आहे. सबब सदर घोषणापत्र (Deed Of Declaration) मधील सर्व अटी, शर्ती व नियम तुम्ही

वाचल्या असुन त्या सर्व तुम्हांस मान्य असुन तुमचेवर बंधनकारक आहेत व राहतील.

४) सदर खरेदीखतान्वये तुम्हांस केवळ पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.---------------- हाच खरेदीदिलेला आहे. सदर खरेदीखतास कायद्यानुसार जोडावे लागणारे आर्किटेक्टचे सर्टीफीकेट व नकाशाची झेरॉक्स प्रत जोडलेली असुन त्यात तुम्हांस आज रोजी खरेदी दिलेली फ्लॅट मिळकत **'हिरव्या'** रंगाने दर्शविलेला आहे.

५) सदर **''गौरी क्लासीक''** चे तारीख / / रोजी केलेल्या घोषणापत्रात नमुद केल्याप्रमाणे तुमचे सदरचे अपार्टमेंट/फ्लॅटसाठी सामाईक सुखसोईंमध्ये तुमचे फ्लॅट जागेचा असलेला अविभाज्य हिस्सासुद्धा तुम्हांस सदरचे खरेदीखताने तबदील केलेला आहे व तो तुम्हांस कधीही विभागून मागता येणार नाही.

६) सदर **''गौरी क्लासीक''** फ्लॅट सिस्टीमचे इमारतीतील तुम्हांस विक्री केलेल्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं.------------- चा वापर तुम्ही इतर फ्लॅट धारकांना त्रास होणार नाही अशारितीने रहीवासासाठीच करावयाचा आहे. तसेच तुम्हास विक्री केलेला फ्लॅट हा पहिल्या मजल्यावरील असल्यामुळे त्याच्या भिंती, तळ, छत, कॉलम, बिम यात इमारतीस कोणत्याही प्रकारे धोका निर्माण होईल असे बदल अगर फेरफार तुम्हांस करता येणार नाही.

७) सदर इमारत **''गौरी क्लासीक''** मधील सर्व वहिवाटदारांनी मिळून सामाईकात हिस्सेराशीप्रमाणे सर्व सामाईक सुखसोईची साफसफाई, दुरूस्ती व ती सुस्थितीत व चालू ठेवण्याचा खर्च तुम्ही सामाईकात हिस्सेराशीप्रमाणे करावयाचा आहे.

८) सदर इमारत **''गौरी क्लासीक''** चे पार्किंगमध्ये तुम्हांस ठरवून दिलेल्या जागेत फक्त एक फोर व्हिलर लावण्याची मुभा राहील व त्या जागेतच तुम्ही तुमची फोर व्हिलर अथवा मोटर सायकल लावायची आहे. तसेच सेप्टीक टँक,

कंम्पाऊंडची भिंत सामाईकात दिलेले आहे त्या सामाईक सुखसोईत व तळजमिनीत तुमचा ------------ **चौरस मीटर अविभाज्य** हिस्सा राहील. वरील सर्व सामाईक सुखसोई तुम्हांस सामाईकात वापरणेचा हक्क आहे व राहील. तसेच ह्या सर्व सामाईक सुखसोईचा वेळोवेळी लागणारा साफसफाई, सुस्थितीत ठेवण्याचा व दुरूस्तीचा खर्च तुम्ही व इतर फ्लॅट धारकांनी सामाईकात करावयाचा असुन अपार्टमेंट ओनरशिप ॲक्टप्रमाणे असोसिएशनला वेळोवेळी द्यावयाचा आहे.

९) सदर इमारत ''**गौरी क्लासीक**'' मधील सर्व फ्लॅट धारकांसाठी सामाईक सेप्टीक टँक असुन त्यास तुमचे व सर्व फ्लॅट धारकांचे संडासचे पाईप कनेक्शन जोडलेले आहे. सबब सदर सेप्टीक टँकचा साफसफाई, दुरूस्ती, मेंटेनन्सचा व वेळोवेळी येणारा अनुषंगीक खर्च तुम्ही व सदर इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात करावयाचा आहे.

१०) सदर इमारत ''**गौरी क्लासीक**'' मधील तुम्हांस खरेदी दिलेल्या फ्लॅट मिळकतीमध्ये आमचे लेखी व पुर्व परवानगी शिवाय कोणत्याही प्रकारचे पक्क्या अगर मुलभुत स्वरूपाचे फेरबदल अगर बांधकाम प्रोजेक्शन वगैरे करता येणार नाही. तसेच इमारतीच्या एलेवेशनमध्ये व बाहेरील कलर स्किम मध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. मात्र सदर फ्लॅटचे आतील भागत तात्पुरत्या स्वरूपाचे सुखसोई करण्यासाठी तुम्हांस परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

११) तुम्ही लिहुन घेणार फ्लॅट धारक कोणत्याही प्रकारचे टाकाऊ पदार्थ, वस्तु अगर घाण किंवा घाणपाणी सदर इमारतीचे ओपन स्पेसमध्ये फेकता अगर टाकता येणार नाही. सदर इमारतीचा परिसर स्वच्छ, सुंदर ठेवण्याची जबाबदारी तुमचेवर व सदर इमारतीतील सर्व फ्लॅट धारकांवर आहे व राहील.

१२) सदर फ्लॅटमध्ये तुम्हांस कोणत्याही प्रकारचे ज्वालाग्राही स्फोटक, अंमली, नशिली दारू अगर धोका उपद्रवकारक, कायद्याने निशिद्ध ठरवलेला व्यवसाय अगर पदार्थाचा साठा करता येणार नाही. तसे काही केल्यास त्यास तुम्हीच सर्वस्वी जबाबदार रहाल.

१३) सदरचे खरेदीखताने तुमचे प्रत्यक्ष मालकी हक्काने ताब्यात व कब्जे वहिवाटीत दिलेल्या फ्लॅट जागेचे आतील सर्व रिपेअर्स व मेंटेनन्स मालक व कब्जेदार म्हणुन तुम्ही स्वत: करावयाचे आहे.

१४) सदर **''गौरी क्लासीक''** मधील सर्व फ्लॅट धारकांसाठी एक सामाईक थ्रीफेज इलेक्ट्रीक मीटर कनेक्शन घेतलेले आहे. जसे सामाईक वापराची जागा, जिना, पार्कींग, वगैरे ठिकाणी दिवे लावणेकामी, बोअरवेलचे पाणी गच्चवरील पाण्याचे टाकीत लिफ्ट करणेकामी व लिफ्टसाठी वापरावयाचे आहे. सबब सदर इलेक्ट्रीक मीटर सुधार बिघाड दुरूस्ती व इले.बील वगैरे खर्च सर्व फ्लॅट धारकांनी सामाईकात हिस्सेराशीप्रमाणे करावयाचा आहे.

१५) यदा कदाचीत भविष्यात धरणीकंप किंवा कोणतेही नैसर्गिक आपत्तीमुळे बिल्डींगचे नुकसान झाल्यास वा पूर्ण बिल्डींग जमीनदोस्त झाल्यास सदरचे जागेवर असलेल्या फ्लॅट सिस्टीमचे हिस्से राशीने रिपेअरींगचा किंवा नविन बांधकाम करणेचा सर्वांना अधिकार राहील. त्यास लागणारा खर्च ज्याचे त्याचे हिस्सेराशीप्रमाणे द्यावा लागेल. व मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करावे लागेल.

१६) सदर इमारत **''गौरी क्लासीक''** मधील सदरची बांधीव फ्लॅट घरजागा तुम्ही अवलोकन करून व सदर घरजागा सुस्थितीत असल्याची तुमची खात्री झालेली असल्यानंतर व सदर स्थावर मिळकतीबाबतचे सर्व दस्तऐवज बघुन खात्री करून घेतलेनंतरच सदरचे खरेदीखत आज रोजी तुम्हांस राजीखुशीने लिहुन नोंदवून दिले जात आहे. त्यानंतर मात्र सदर घरजागेत कोणत्याही प्रकारचे पड–झड झाल्यास

अगर दुरूस्ती करावी लागल्यास त्याकामी येणार संपुर्ण खर्च तुम्ही लिहुन घेणार यांनीच करावयाचा आहे. तसेच मंजुर नकाशात दाखविल्याप्रमाणे असलेल्या फ्लॅटच्या रचनेत तुम्हांला कोणत्याही प्रकारची तात्पुरत्या अगर कायमस्वरूपाचे फेरबदल करता येणार नाही. त्याबाबतची कोणतीही जबाबदारी आम्ही लिहुन देणार यांचेवर राहणार नाही. यापुढील सर्व बांधकामाविषयीच्या तक्रारींचे निवारण तुम्ही तुमचे खर्चाने करून घेणेचे मान्य व कबुल केलेले आहे.

१७) सदर वर सविस्तर वर्णन केलेल्या फ्लॅट घरजागा आम्ही यापुर्वी कोठेही गहाण, दान, खरेदी, बक्षिस, लीज, विक्री, तारण, अगर अन्य बोजात, करारात, हक्कसंबंधात, जप्तीत, अदलाबदलखत, जामीनकीत, कोर्टकारवाईत वारसाहक्कात, मृत्युलेखात अथवा कोणत्याही बोज्यात अगर जडजोखमी मध्ये अडकविलेली नाही. सदर फ्लॅट मिळकतीस क्लिअर टायटल आहे. याही उपर तसे काही निघाल्यास त्याची सर्व जबाबदारी आमचेवर राहील. त्याचे खर्चाची कोणतीही तोशीष तुम्हास लागु देणार नाही. सदर मिळकत आम्ही बोजेविरहीत व कर्जविरहीत निर्वेध खरेदी करून देत आहोत.

१८) सदर फ्लॅट बाबतचे बांधीव व खुल्या जमिनी बाबतचे आजपावेतोचे शेतसारा, बदलुसारा, खुला भुखंड कर, घरपट्टी व इतर सरकारी–निमसरकारी कर, महानगरपालिका कर वगैरे आम्ही भरलेले असून यापुढील येणारे सर्व कर मालक व कब्जेदार म्हणुन तुम्ही भरावयाचे आहेत.

१९) आता सदर खरेदीखतान्वये तुम्हांस विक्री केलेल्या ''**गौरी क्लासीक**'' मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र.----------- चे तुम्ही पूर्ण मालक व कब्जेदार झाला आहात. सबब तुम्ही सदर फ्लॅट जागेचा यापुढे मालकी हक्काने वापर उपभोग घ्यावा अगर तुमचे मर्जिनुरूप विनीयोग करावा किंवा तुम्ही त्रयस्थ इसमास

तबदील करू शकतात मात्र घेणाऱ्यावर वरील सर्व शर्ती बंधनकारक राहतील.

२०) वरील खरेदीखतान्वये तुम्हांस विक्री दिलेले बांधीव फ्लॅट घरजागेचे तुम्ही पुर्ण मालक व कब्जेदार झाला आहात. सबब आता तुम्ही सरकारी रेकॉर्डवर व ७/१२ उताऱ्यावर तुमचे नाव लावुन घ्यावे. त्यासाठी आमच्या सह्यांची जेथे जेथे आवश्यकता लागेल तेथे तेथे आम्ही तुम्हांस विनामुल्य सह्या दिलेल्या आहेत.

२१) सदर संपुर्ण इमारत ''**गौरी क्लासीक**'' या इमारतीचे गच्चीचा वापरण्याचा हक्क सर्व फ्लॅट धारकांचा सामाईकात राहील. याबाबत तुम्हास काही एक हरकत अगर अडीअडचण करता येणार नाही. ही महत्त्वाची अट आहे.

२२) सदर इमारतीचे पार्कींग, तळ मजला, पहिला मजला, दुसरा व तिसरा या मजल्यापर्यंत बांधकाम पूर्ण झाल्याबाबतचे मे.आयुक्त साहेब जळगांव शहर महानगरपालिका यांचेकडील कम्प्लीशन सर्टीफिकेट सदरचे खरेदीखतासोबत जोडलेले असुन ते तुमचे भोगवट्यास दिलेले आहे.

२३) सदरचे खरेदीखतासाठी लागणारा संपुर्ण खर्च जसे – स्टॅम्प, रजिस्ट्रेशन फी, कॉम्प्युटर चार्जेस, झेरॉक्स चार्जेस व इतर अनुषंगीक खर्च तुम्ही लिहून घेणार यांनीच करावयाचा आहे.

२४) सदरचा खरेदीखताचा व्यवहार आपलेसह उभयंताचे सर्व वंशवारसांवर, नातेवाईक, भाऊबंद, बहीणी, वगैरे यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

वरीलप्रमाणे रक्कम रुपये -----------/- ---------------------------------- मात्रचा भरणा पावला. भरण्याबद्दल आमची कोणतीही तक्रार राहीली नाही. व बांधीव फ्लॅट घरजागेचा तुम्हांस कब्जा दिला. आता कब्जाबद्दल तुमची कोणतीही तक्रार राहीली नाही.

हे खरेदीखत आम्ही राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजुन, उमजुन, वाचुन घेऊन, उभय साक्षीदारांसमक्ष सह्या करून, खरेदीखतातील भरण्याची रक्कम कबुल करून आज रोजी जळगांव मुक्कामी लिहून व नोंदवून दिले असे.

**लिहून देणार – सही** **नि.डा. अंगठा**

---------------------

१) ------------------

---------------------

२) ------------------

**लिहून घेणार – सही** **नि.डा. अंगठा**

---------------------

---------------------

**साक्षीदार**

१) --------------------

**नाव –**

**वय –**

**पत्ता –**

२) ------------------

**नाव –**

**वय –**

**पत्ता –**

# प्रतिज्ञापत्र

सदर दस्तावेज हा नोंदणी कायदा १९०८ अंतर्गत असलेल्या नियमातील तरतुदीनुसारच नोंदणींस दाखल केलेला आहे. प्रस्तुत दस्तातील संपूर्ण मजकूर निष्पादीत व्यक्ती, साक्षीदार, ओळखदार व सदर दस्तासोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता दोन्ही पक्षकार यांनी तपासली आहे. दस्ताची सत्यता/वैधता कायदेशीर बाबींसाठी दस्त निष्पादक व कबुलीधरक हे स्वत: जबाबदार राहतील. दस्तावेज सोबत जोडलेले कागदपत्रे, कुलमुखत्यार धारक व्यक्ती, ओळखदार, साक्षिदार इत्यादी बनावट, खोटे बेकायदेशीर आढळून आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी दस्तऐवज निष्पादकांची राहील.

तसेच महाराष्ट्र नोंदणी नियम १९६१ चे कलम ४४/१ नुसार सदर दस्ताची वैधता तपासण्याची जबाबदारी नोंदणी अधिकाऱ्याची नाही. मालमत्ता हस्तांतरण कायदा १८८२ चे कलम ५५ नुसार दस्तातील नमुद मिळकतीचे हक्क (Title) तपासून घेण्याची जबाबदारी लिहून देणार व लिहून घेणार तसेच पक्षकार यांची आहे. त्यास इतर कुणीही जसे दस्त बनविणार/टाईप करणार जबाबदारी नाही. याची जाणीव दस्तातील दोन्ही पक्षकार यांना आहे.

तसेच सदर दस्तात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही कार्यालयात अथवा न्यायालयात दावा/खटला/वाद दाखल नाही. तसेच दस्तात नमुद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयाकडून स्टे आर्डर किंवा मनाई हूकुम मिळालेला नाही. याबाबतची समज दस्तातील लिहून देणार/घेणार व पक्षकार यांना आहे. सदर मजकूर आम्ही वाचला असून तो आम्हाला मान्य व कबुल आहे.

| **लिहून देणार – सही** | **लिहून घेणार – सही** |
|---|---|
| ------------------ | ------------------ |
| ------------------ | ------------------ |